**अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी यादी**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात बालगृहाचे अनुदान अदा करणेबाबत

**(१) २८६८ (१९-०६-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धर्मादाय कार्यालयाकडे महिला व बालकल्याण विभागाची मान्यता घेऊन नोंदणीकृत संस्था बालगृह चालवत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात १३० बालगृह सुरु असून या बालगृहात अनाथ, निराधार, निराश्रित बालकांचा सांभाळ करण्यात येत असून शासन प्रती बालक रुपये २०००/- सहाय्यक अनुदान देते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन शासनाने सन २०१८ मध्ये बालगृहाने पुन्हा नव्याने नोंदणी करावी व काही जाचक अटी घातल्या असून त्या पूर्ण करणे शक्य नसल्याने काही बालगृह चालक मा.न्यायालयात गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालगृह चालक न्यायालयात गेले असल्याने महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या बालगृहाचे सहाय्यक अनुदान दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा.न्यायालयाने दिल्याप्रमाणे आदेश बालगृहाचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०)** : (१) हे खरे आहे.

(२) मराठवाड्यात माहे मे, २०२० अखेर ९६ मान्यता प्राप्त संस्था असून त्यापैकी ५८ संस्थांतील १२२२ प्रवेशितांकरीता प्रती बालक २०००/- सहाय्यक अनुदान दोन टप्प्यात वितरीत करण्यात येत असते.

(३) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत सर्व संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र घेणे अनिवार्य असून या अधिनियमामध्ये नमूद तरतूदींव्यतिरीक्त इतर कोणत्याही जाचक अटी शासनाकडून लादण्यात आलेल्या नसून औरंगाबाद जिल्ह्यातील काही संस्था चालकांनी मा.न्यायालयात रिट याचिका दाखल केल्या आहेत.

(४) हे खरे नाही,

औरंगाबाद जिल्ह्यातील काही संस्था चालकांनी मा.न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकांच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये सदर संस्थांना सहायक अनुदाने देण्याबाबत कोणतेही निर्देश देण्यात आलेले नाहीत व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र.३३३५२/२०१७ मध्ये दिलेल्या आदेशामध्ये सर्व बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य असल्याने आदेश दिलेले असल्याने ज्या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र नाहीत अशा संस्थांना अनुदान वितरीत करता येवू शकत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वैद्यकीय प्रतिपुर्तीमध्ये कोरोना व सारी आजारांचा समावेश करण्याबाबत

**(२) २८९० (१९-०६-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी आजाराची सूची शासनाने निश्चित केलेली आहे व त्यानुसार त्यांच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपुर्ती केली जाते, त्या उपचारांच्या यादीमध्ये कोरोना व सारी सारख्या आजारांचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वैद्यकीय प्रतिपुर्तीमध्ये कोरोना व सारी आजारांचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२८-०७-२०२०) :** (१) राज्य शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता, विभागाच्या दि.१९/०३/२००५ च्या शा.नि. अन्वये आकस्मिक व गंभीर आजारांची यादी निश्चित करण्यात आलेली आहे. या यादीमध्ये Pulmonary Emergency या आजाराचा समावेश असून त्यात श्वासोश्वासाचा त्रास असलेल्या सारी व कोरोना रुग्णांचा अंतर्भाव होतो.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

## परभणी जिल्ह्यातील जलयुक्त शिवाराच्या कामाबाबत

**(३) २९०६ (२९-०५-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानातील बहुतांश कामे अर्धवट स्थितीत राहिली असून झालेल्या कामांपैकी अनेक कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याने त्या कामांची व तपासणी करणाऱ्या अधिकारी व त्रयस्थ यंत्रणेची चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी कंत्राटदार, तपासणी करणारे अधिकारी व त्रयस्थ यंत्रणा यांच्याविरूध्द चौकशी, कारवाई, निलंबन तसेच गुन्हे नोंदवणे याबाबत आदेशित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# राज्यात सर्व विभागात मुलींसाठी शासकीय निरीक्षणगृह स्थापन करणेबाबत

**(४) २९२९ (०२-०६-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अमरावती विभागातच मुलींसाठी शासकीय निरीक्षणगृह कार्यान्वित असून उर्वरित विभागात शासकीय निरीक्षणगृह नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात १२ जिल्ह्यांमध्ये १२ संस्थांमार्फत चालवल्या जाणारे १२ मुलींसाठीचे निरीक्षणगृह कार्यान्वित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वर्तमान परिस्थिती लक्षात घेता सर्व विभागात मुलींसाठीचे शासकीय निरीक्षणगृह स्थापन करण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२६-०८-२०२०) :** (१) अमरावती येथे मुलींसाठी एक शासकीय निरीक्षणगृह यापुर्वी कार्यरत होते आता पुणे येथे मुलींसाठी एक शासकीय निरीक्षणगृह कार्यरत झाले आहे.

(२) राज्यामध्ये माहे मे, २०२० मध्ये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र प्रदान केल्यानुसार मुलींसाठी ०२ शासकीय व १७ स्वयंसेवी निरीक्षणगृहे असे एकूण १९ निरीक्षणगृहे ही १८ जिल्ह्यात कार्यान्वित आहेत.

(३) निरीक्षणगृहे हे विधिसंघर्षग्रस्त बालकांसाठी असून, शासकीय मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह बुलढाणा व शासकीय अपंग मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह चंद्रपूर या मुलांसाठी असलेल्या दोन संस्था मुलींसांठी निरीक्षणगृह/बालगृह म्हणून प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत.

त्या संस्था मुलींसाठी निरीक्षणगृह म्हणून कार्यान्वित करण्याची कार्यवाही चालु आहे. त्यामुळे मुलींसाठी ०२ शासकीय १७ स्वयंसेवी निरीक्षणगृहे, असे एकूण १९ निरीक्षणगृहे तसेच प्रस्तावित असलेली २ असे मिळून मुलींसाठी पुरेशी एकूण २१ निरीक्षणगृहे २० जिल्ह्यात कार्यान्वित होतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना विषाणूमुळे राज्यात अन्य आजारांच्या रुग्णांकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(५) ३०४५ (१७-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शासकीय यंत्रणा कोरोना केंद्रित झाली असून त्याचा परिणाम राज्यातील अन्य आजारांच्या रुग्णांवर होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन महिन्यात कोरोना विषाणूमुळे राज्यातील ११०५ मातांचे व अर्भकांचे मृत्यू झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी पाड्यातील गर्भवती महिलांच्या आरोग्य समस्यावर लक्ष देणे व त्यांना बाळंतपणासाठी रुग्णवाहिका मिळवून देण्यासाठी परिचारिका व आशा सेविकांना वेळच मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

एचएमआयएसच्या अहवालानुसार राज्यात माहे मार्च, २०२० व एप्रिल, २०२० महिन्यात १८६ माता मृत्यू व १७२८ अर्भक मृत्यू झाले आहेत.

(३) हे खरे नाही.

गर्भवती मातांना प्रसुतीसाठी आरोग्य संस्थेमध्ये दाखल करण्यासाठी १०२ तसेच १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच प्रसुतीच्या वेळी आशा कार्यकर्ती तसेच आरोग्य सेविका ह्या संदर्भ सेवेच्या ठिकाणापर्यंत रुग्णाच्या सोबत जात असतात.

(४) बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील उपाययोजना राबविण्यात येतात -

**बाल आरोग्य संबंधी योजना -** घरच्या घरी नवजात बालकांची काळजी (Home Based New Born Care) १३ व्या वित्त आयोगांतर्गत इंन्टेसिफाईड एचबीएनसी (Intensified HBNC), होम बेस्ड केअर फॉर यंग चाईल्ड, नियमित लसीकरण, Mother Absolute Affection (MAA), अतिसार नियंत्रण पंधरवडा (IDCF), जंतनाशक मोहिम (De-worming Drive), ॲनिमिया मुक्त भारत, नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष (New Born Care Corners- (NBCC), बाल उपचार केंद्र (Child Treatment Centers- CTC), पोषण पुनर्वसन केंद्र (Nutrition Rehabilitation Centre-NRC), नवसंजीवनी योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, बालमृत्यू अन्वेषण.

**माता आरोग्य संबंधी योजना -** गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थात्मक प्रसूती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना,

**प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना-** कोविड काळात व त्यानंतर माता बाल संगोपन सेवा सुरु ठेवणेकरीता उपाययोजना सुचविणेकरीता शासनाने संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली नवजात बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञांची समिती स्थापन केली असून या समितीच्या शिफारशीनुसार अतिरिक्त उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाडयातील दुष्काळी भागाला कोकणातील पाणी देण्याबाबत

**(६) ३०५९ (०२-०६-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील दुष्काळी भागाला कोकणातील पाणी देण्याचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडॉऊनमध्ये सिंचन योजनेची कामे सुरु करण्यास शासनाने मुभा दिलेली असल्याने या कामाची सुरुवात करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, कामाची सद्य:स्थिती काय आहे व सदरील काम पुर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२७-०७-२०२०) :** (१) होय.

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/(७५/२०१९)/जसंअ दि.१९/०९/२०१९ अन्वये गोदावरी खो-यातील दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी व गिरणा उपखो-यासाठी कोकणामधून पाणी वळविण्यासाठीच्या योजनांना तत्वत: मान्यता दिलेली आहे.

(२) नाही.

(३) पश्चिमवाहिनी नदी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाडयात वळविणेसाठी एकात्मिक राज्य जल आराखडयात अंतर्भूत असलेल्या योजनांचा प्राथमिक अभ्यास करणेसाठी शासन निर्णय दि.१७/०९/२०१९ अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करणेत आली आहे. सदर समितीने त्यांचा अहवाल दि. ३१/१०/२०१९ रोजी शासनास सादर केला आहे. त्यानुसार गोदावरी खोऱ्यातील मराठवाडा प्रदेशात कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हासनदी खोऱ्यातून एकूण ८९.८५ अघफू पाणी वळविणेबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे. उपरोक्त पैकी २.४३ अघफू पाणी वळणाच्या पूर्ण/बांधकामाधीन योजना आहेत. १५.५५ अघफू पाणी वळणाबाबत पार-गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात

आलेला असून दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी या दोन नदीजोड प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेमार्फत तयार करण्यात येत आहे. दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उर्ध्व वैतरणा धरणातून गोदावरी खो-यात १० अघफू पाणी सोडण्यात येईल. उर्वरीत ६१.८८ पाणी वळणाबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बालगृह निवासी संस्था चालवण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत

**(७) ३०७६ (०२-०६-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बालगृह निवासी संस्था चालवण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक असून महिला व बालविकास विभागामार्फत ही प्रमाणपत्र देण्यात येतात व त्यासाठी माहे मार्च, २०१८ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते व त्यानुसार दोन टप्प्यात ११७३ संस्थेचे अर्ज शासनास प्राप्त झाल्यानंतर नियमित कामकाज व सर्व कागदपत्रे असलेल्या १३१ संस्थांना माहे मार्च, २०१९ मध्ये प्रमाणपत्र दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालन्याय कायद्यानुसार बालकांसाठी विनापरवाना निवासी संस्था चालविण्यास एक वर्षापर्यंत कैद व एक लाखापेक्षा कमी नाही इतका दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्यांना ही प्रमाणपत्र दिली नाहीत त्यापैकी मुले असलेल्या संस्थांना दिनांक १ मार्च, २०१९ रोजी पुढील आदेशापर्यंत मुदतवाढ मिळाली परंतु एक वर्ष उलटूनही नोंदणी प्रमाणपत्र दिली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील १०४२ बालगृहाची नोंदणी दोन वर्षांपासून प्रलंबित असून शासनाने त्यांना मुदतवाढ दिली आहे त्यांच्या नोंदणी प्रमाणपत्राचे पाच वर्षात नुतनीकरण करणे बंधनकारक आहे पण मूळ नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास दोन वर्षे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बालगृह निवासी संस्था चालवण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्र मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.

माहे मार्च, २०१९ मध्ये स्वयंसेवी संस्थांचे १३१ व शासकीय ३७ असे एकूण १६८ संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र मंजूर केल्यानंतर इतर अर्जाच्याबाबत छाननी करून नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याने या कालावधीमध्ये प्रवेशित असलेल्या व नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या ३९४ संस्थांच्या नोंदणी प्रमाणपत्रास मुदतवाढ देण्यात आली होती.
(४) व (५) नाही.

प्राप्त सर्व प्रस्तावांची छाननी करून शासन निर्णय, दिनांक ०६/०५/२०२० अन्वये २८० स्वयंसेवी संस्थांच्या नोंदणी प्रमाणपत्रास मान्यता देण्यात आली आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील काळू धरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(८) ३०७७ (२९-०५-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महत्त्वाच्या धरणांपैकी एक असलेल्या ठाणे जिल्ह्यातील काळू धरणाच्या कामावरील स्थगिती आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी उठवल्यानंतर राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत एमएमआरडीए आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळाला धरणाच्या कामाला गती देण्याचे आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ मध्ये काळू धरण बांधण्याचा प्रस्ताव कोकण पाटबंधारे विभागाने एमएमआरडीएला सादर केला तेव्हा धरण बांधण्याचा खर्च रुपये ६६१ कोटी इतका होता, परंतु सन २०१७-२०१८ च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार धरण बांधण्याचा खर्च चौपट म्हणजे रुपये २७८५ कोटीपर्यंत वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणाच्या कामात प्रामुख्याने कोणकोणत्या अडचणी आहेत व विनाविलंब या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) तसेच, धरणाच्या कामातील तांत्रिक तपासणी सल्लागारामार्फत करावी, अपेक्षित खर्चाचा तपशील सादर करावा, प्रकल्पातील भूसंपादन, पुनर्वसनाची कामे पूर्ण करून धरण बांधण्यास सुरुवात करावी असे आदेशही देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१८-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

काळू धरणाच्या कामाची गती देण्याचे दृष्टीने मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे दिनांक ०८/११/२०१९ रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत सदर प्रकल्पास सत्वर गती द्यावी, असा निर्णय घेण्यात आला.
(२) होय.

सन २०१८-२०१९ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची अद्यावत सु.प्र.मा.किंमत रुपये ३१३१.७६ कोटी इतकी आहे.
(३) वनजमीन संपादनासाठी वन विभागास नक्त वर्तमान मूल्य (NPV) देय रक्कम रुपये २५९ कोटी भरणे, १३५९ हे. खाजगी जमिनीचे भूसंपादन करणे व बाधित गावांचे पुनर्वसन करणे. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत प्रकल्पाचे उघड चौकशीअंती अधिकारी व ठेकेदार यांचेविरूध्द गुन्हा दाखल असून तपास चालू असणे. या अडचणी असून यासाठी एमएमआरडीएकडून निधी मिळणेबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(४) सदर बैठकीमध्ये धरणाची तांत्रिक तपासणी सल्लागारामार्फत करणेबाबत कोणतेही आदेश देण्यात आले नाहीत. तथापि, MMRDA मार्फत श्री.श्रीखंडे यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली होती. तसेच

प्रकल्पाचा सद्य:स्थितीतील अपेक्षित खर्च व प्रकल्पातील भूसंपादन, पुनर्वसन इत्यादी कामे टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करून पूर्ण करण्याबाबत दिनांक ०८/११/२०१९ च्या बैठकीत निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) ३०९५ (२९-०५-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असून मागील काही महिन्यांपासून अस्थिरोग, फिजीशयन, रेडिओलॉजिस्ट, त्वचारोग विभागात एकही वैद्यकीय अधिकारी नसल्याने तसेच वर्ग-१ ते ३ मधील निम्मी पदे रिक्त असल्याने रुग्णसेवेवर त्याचा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण अधिक असल्याने रुग्णांवर अनेकवेळा शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असताना वैद्यकीय अधिकारीच नसल्याने रुग्णांना वैद्यकीय उपाचारापासून वंचित राहावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी तसेच अन्य संवर्गातील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२५-०८-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे

जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे गट-अ ते गट-क संवर्गातील एकूण १९१ पदे मंजूर असून, १३६ पदे भरलेली आहेत. तसेच कंत्राटी स्वरुपात व राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत २९ पदांवर अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामार्फत रुग्णालयीन सेवा पुरविण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे अस्थिव्यंग तज्ञ उपलब्ध नसल्याने जिल्हयातील ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयातील अस्थिरोग तज्ञांची सेवा उपलब्ध करुन घेऊन रुग्णाना आरोग्य सेवा व उपचार करण्यात येत आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे भूलतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ व रेडीओलॉजीस्ट यांच्या सेवा ऑनकॉल पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यात येतात. तसेच बालरोगतज्ञ, न्युरो सर्जन यांच्या सेवा घेण्यात आलेल्या आहेत व भिषक यांच्या पार्टटाईम सेवा घेण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-२३ : ६७७००-२०८७००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सरळसेवेच्या वाटयाची जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. विशेषज्ञ संवर्गातील बालरोग तज्ञ, कान, नाक, घसातज्ञ, अस्थिव्यंगोपचार तज्ञ, क्ष-किरणतज्ञ, नेत्रशल्यचिकित्सक, मनोविकृती चिकित्सक, क्षयरोग चिकित्सक, स्त्रीरोगतज्ञ व प्रसुतीतज्ञ व बधिरीकरणतज्ञ या पदावर पदोन्नतीने नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. शरिरविकृतीशास्त्रज्ञ या पदावर पदोन्नती देण्यासबंधीची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-२० : ५६१००-१७७५००) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत कंत्राटी तत्वावर मानधनावर वैद्यकीय अधिकारी अथवा उपसंचालक कार्यालयाकडून बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५ तयार करण्यात आले आहेत व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार नागपूर, अमरावती व औरंगाबाद

या महसुली विभागातील मंजूर पदांच्या ८० टक्के इतकी पदे भरण्यासाठी आवश्यक पदांची संख्या निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच या तीन महसुली विभागात पदे भरण्यासाठी आवश्यक असलेली पदसंख्या, एकूण वाटपासाठी उपलब्ध असलेल्या उमेदवारांच्या / अधिकाऱ्यांच्या पदसंख्येतून वजा करुन त्यानंतर वाटपासाठी उपलब्ध असलेल्या उर्वरित पदसंख्येच्या ८० टक्के पदे नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-१ व नाशिक या महसूली विभागाकरिता सुनिश्चित केल्यानंतर, या पाच महसुली विभागातील रिक्त पदांच्या प्रमाणात या पाच महसुली विभागात वाटप करण्यात यावे. तसेच, उर्वरित वाटपासाठी उपलब्ध पदसंख्येच्या २० टक्के पदे कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-१ व पुणे या महसुली विभागांकरिता सुनिश्चित केल्यानंतर, या दोन महसुली विभागांतील रिक्त पदांच्या प्रमाणात या दोन महसुली विभागात वाटप करण्यात यावे व पसंती दिलेल्या महसुली विभागात वाटपासाठी पद उपलब्ध नसल्यास चक्राकार पध्दतीने महसुली विभाग वाटप करावी अशी तरतूद सदर अधिनियमात आहे. त्यानुसार नागपूर, अमरावती व औरंगाबाद या महसुली विभागात ८० टक्क्यापेक्षा अधिक पदे उपलब्ध असल्याने, उर्वरित महसुली विभागासाठी पदे उपलब्ध झालेली नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आजनसरा बॅरेज प्रकल्पाला (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) मंजूरी मिळूनही कामाला सुरुवात न झाल्याबाबत

**(१०) ३१७२ (२९-०५-२०२०).** श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजनसरा बॅरेज प्रकल्पाला (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) सन २००५-२००६ च्या दरसुचीनुसार प्रकल्पाला सुधारित मान्यता तसेच रूपये २०,८४२.२७ लक्ष देवूनही प्रकल्पाची कामे सुरु न झाल्यामुळे लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ जून, २०१९ रोजी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले असूनही प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे हिंगणघाट तालुक्यातील ४८ गावातील २४,००० हेक्टरी शेती सिंचनापासून वंचित असून १२ गावातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याने सदर प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी पूर्ण करून शासनाने सुधारित मान्यता देवून कामांना सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०७-२०२०) :** (१) आजनसरा बॅरेज प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्यामुळे सन २००५-२००६ च्या दरसुचीनुसार रुपये २०८.४२ कोटी रुपयास नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून, प्रारंभिक कामावर (पर्यायी वनीकरण) आतापर्यंत रुपये १२.४० कोटी खर्च झालेले आहेत. मुख्य कामास सुरुवात झालेली नाही.
(२) व (३) प्रकल्पाच्या कामास अद्याप सुरुवात झालेली नाही. प्रकल्पास आवश्यक वन जमीन मान्यता, पर्यावरण मान्यता तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याचे अनुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## वसई (ता.वसई, जि.पालघर) किल्ल्यामध्ये सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(११) ३२५३ (०२-०६-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) समुद्रकिनारपट्टीलगत असलेल्या वसईच्या किल्ल्यामध्ये महिला व मुलींची छेडछाड, मद्यपान, धुम्रपान व इतर अंमली पदार्थांचे सेवन, विवाहपुर्व छायाचित्रणाच्या नावाखाली प्रेमी युगुलांचे अश्लिल चाळे, विनापरवानगी चित्रिकरण अशा व इतर विविध गैरप्रकारांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याची बाब विविध दुर्गप्रेमी संस्था, संघटना, इतिहास अभ्यासक व पर्यटन प्रेमी यांच्याकडून निदर्शनास आणून दिली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसईच्या किल्ल्यामध्ये अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पवित्र वास्तूचे महत्व, संवर्धन आणि संरक्षण करण्याच्यादृष्टीने भारतीय पुरातत्व विभाग आणि स्थानिक महानगरपालिका व पोलीस प्रशासन यांच्या समन्वय आणि सहकार्याने वसईच्या किल्ल्यामध्ये सुरक्षा यंत्रणा निर्माण करण्याची मागणी वसई तालुक्यातील स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२४-०८-२०२०) :** (१), (२), (३) व (४) वसई किल्ल्यात गैरप्रकार घडत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत ही बाब खरी आहे. वसई किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्या अखत्यारीत आहे. सद्य:स्थितीत किल्ल्यावर एस.आय.एस.चे सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत. किल्ल्यामधील सुरक्षेकरीता तसेच गैरप्रकार व अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ हे वेळोवेळी संबधीत स्थनिक प्रशासनाशी पत्रव्यवहार करते. किल्ल्याच्या काही भागात स्थानिकांच्या वास्तव्यामुळे संपूर्ण किल्ल्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. सद्य:स्थितीत किल्ल्यावर एस.आय.एस.चे सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहे. तसेच आणखी ५० सुरक्षारक्षक नेमण्यास मान्यता देण्याबाबत महानिर्देशक, भारतीय पुरातत्व विभाग, नवी दिल्ली यांना भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय, मुंबई यांनी पत्र पाठविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार (जि.पालघर) शहरात कुपोषित बालकांना पोषक आहार व वसई तालुक्यातील अंगणवाड्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१२) ३२८५ (२९-०५-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) शहरात सन २०१९ मध्ये झालेल्या कुपोषित बालकांच्या सर्व्हेक्षणात ९३ बालके ही कुपोषित असल्याची तसेच वसई तालुक्यातील बहुतांशी अंगणवाड्या ह्या देखभाल-दुरुस्ती-डागडूजी अभावी बंद असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिक व वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी यांनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये येत असलेल्या ४२१ अंगणवाड्या यांचे कामकाज नागरी प्रकल्प विभाग, भाईंदर (प.) आणि एकात्मिक बालविकास सेवा योजना वसई-१ व वसई-२ यांच्या अखत्यारीत येत असल्यामुळे सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याची सूचना दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुपोषित बालकांना पोषक आहार मिळण्याबाबत तसेच अंगणवाड्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) स्थानिक लोकप्रतिनिधीचे निवेदन बालविकास प्रकल्प अधिकारी वसई-१, वसई-२ व बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) भाईंदर (प.) यांना आवश्यक

कार्यवाहीसाठी प्राप्त झाले आहे. त्यानुसार अंगणवाडीच्या इमारतींची पाहणी करुन जिल्हा परिषदमार्फत दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे. पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदअंतर्गत वसई तालुका ग्रामीण अंतर्गत वसई-१ व वसई-२ प्रकल्पांतर्गत येणाऱ्या ३८१ अंगणवाड्या ह्या चालू असून देखभाल दुरुस्ती डागडूजी अभावी बंद नाहीत.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कुपोषित बालकांना पोषण आहार देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१. ६ महिने ते ३ वर्ष या वयोगटातील लाभार्थी तसेच गरोदर व स्तनदा माता यांना घरपोच आहार नियमितपणे वितरीत करण्यात येतो.

२. सद्य:स्थितीत कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येत आहे.

३. तसेच अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर व स्तनदा मातांना चौरस आहार देण्यात येत आहे व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ वेळा अंडी, केळी सुध्दा वितरीत करण्यात येतात.

४. वसई-१ व वसई-२ या ग्रामीण प्रकल्पांमध्ये कुपोषित बालकांना ग्राम बालविकास केंद्रामध्ये दाखल करण्यात येते. कुपोषित बालकांसाठी VCDC केंद्र सुरु करण्यात आले असून त्यामधून त्यांना अमायलेज रिच फुड देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांना विकास कामासाठी निधी देणेबाबत

**(१३) ३२९७ (३१-०५-२०२०). श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौदाव्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतीमार्फत जिल्हा परिषदेच्या शाळांना विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जात असून खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना विकास कामासाठी निधी दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौदाव्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतीमार्फत खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना विकास कामासाठी निधी देणेबाबतची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चौदाव्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतीमार्फत खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांना विकास कामासाठी निधी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२०-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य कामगार रुग्णालयातील पद भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१४) ३३२५ (२९-०५-२०२०). श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येत असलेल्या राज्य कामगार रुग्णालयातील ५५२ पद भरतीत लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त संजीवकुमार यांच्यामार्फत झालेल्या चौकशीत गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भरतीत माजी सैनिक अथवा त्यांच्या कुटुंबियांसाठी राखीव असलेल्या ७५ पदांवर माजी सैनिक या प्रवर्गातील उमेदवारांना डावलून अन्य प्रवर्गातील उमेदवारांची भरती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यात सेवानिवृत्तीपूर्वी एक दिवस अगोदर नियुक्ती पत्र देण्याच्या प्रस्तावाला तत्कालीन आयुक्तांनी मंजुरी दिल्याची बाब निदर्शनास आली असल्याने सदरची भरती प्रक्रियाच रद्द करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या परीक्षेत सन २००८ पासून कार्यरत असणाऱ्या १८८ पैकी १८८ परिचारिका अनुत्तीर्ण होऊन कसलाही अनुभव नसलेले ५५२ उत्तीर्ण उमेदवार ज्यामध्ये एकाच परिसरातील अनेक उमेदवारांचा समावेश असल्याचे चौकशीत उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महाऑनलाईन कंपनीच्या कारभाराची चौकशी करून झालेल्या अनियमिततेच्या व गैरव्यवहार प्रकरणी मंत्री महोदयांनी दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी बैठक घेऊनही प्रधान सचिवांकडून कार्यवाही झाली नसल्याने सदरची भरती रद्द करून दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) आयुक्तालयाच्या दिनांक २१/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त प्राथमिक अहवाल व दिनांक १७/०६/२०१९ च्या पत्रान्वये प्राप्त अहवालाच्या आधारे सन २०१७ मधील सम वैद्यकीय पद भरतीमध्ये अनियमितता झाल्याचे प्रथमदर्शनी आढळून येत आहे. त्यानुसार शासनाच्या दिनांक २७/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाने मे.महाऑनलाईन यांच्याकडून आवश्यक माहिती प्राप्त करुन भरती प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याकरीता प्रस्ताव आयुक्तालयाच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह सादर करण्याचे कळविण्यात आले आहे.

___________

## रायगड जिल्ह्यात धरण वा बंधारे बांधणेबाबत

**(१५) ३४५४ (०२-०६-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात दरवर्षी सरासरी तीन हजार इतका पाऊस पडत असून पावसाचे पाणी साठविण्यासाठी वा अडविण्यासाठी कोणतीही पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे पावसाचे पाणी समुद्रात वाहून जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्याच्या अनेक भागात अलिबाग, पेण, कर्जत, महाड, पोलादपूर, म्हसळा व श्रीवर्धन या तालुक्यांमध्ये दरवर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात पडणाऱ्या पावसाचे पाणी साठवून अथवा अडवून ठेवण्यासाठी छोटे-मोठे धरण बांधण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१८-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) रायगड जिल्ह्यामध्ये फेब्रुवारी अखेरपासून पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणेस सुरुवात होते. टंचाई कालावधीमध्ये पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा केलेला आहे. त्यामधील प्रस्तावित उपाययोजनानुसार आवश्यकतेनुसार ग्रामस्थांना पाणीपुरवठा करण्यात येतो.

रायगड जिल्ह्यात पडणाऱ्या पावसाचे पाणी साठवून अथवा अडवून ठेवण्यासाठी रायगड जिल्ह्यात ० ते २५० हे. सिंचन क्षमतेच्या ५८ योजना पूर्ण झालेल्या आहेत. त्याद्वारे १०३०१.७७ सघमी इतका पाणीसाठा निर्माण झालेला आहे तसेच ५४ योजना प्रगतीपथावर असून त्यामुळे ३३२१२ सघमी पाणीसाठा निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच ३९ योजना भविष्यकाळात प्रस्तावित आहेत.

रायगड जिल्हा परिषदेने ४५ धरणे, ४६ के.टी. बंधारे व ३१ सिमेंट बंधारे बांधलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील अंगणवाड्यांना कच्च्या धान्याचा पुरवठा होत असल्याबाबत

**(१६) ३५६५ (०२-०६-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये पोषण आहार पुरवठा करण्यासाठी ठेकेदार नसल्याने फेडरेशनच्या माध्यमातून केवळ कच्चे धान्य अंगणवाडीतील ३ ते ६ वयोगटातील बालकांसह गरोदर व स्तनदा मातांना दिले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाड्यांना पोषण आहार पुरवठा करण्यासाठी पुरवठादार नियुक्त न करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, अंगणवाड्यांना कच्च्या धान्याचा होत असलेल्या पुरवठ्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

उस्मानाबाद जिल्हयात ३ ते ६ वयोगटातील लाभार्थ्यांना आहार पुरवठयासाठी नेमलेल्या महिला बचतगटांनी काम सोडून दिल्यामुळे पर्यायी व्यवस्थेंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यासाठी महिला संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर महिला संस्थेकडून कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा अंगणवाडी स्तरावर करण्यात येतो. सदर कच्चे धान्य व किराणा मालापासून अंगणवाडी सेविका/मदतनीस हे गरम ताजा आहार तयार करुन लाभार्थ्यांना वितरीत करतात. तथापि, राज्यात माहे मार्च, २०२० पासून कोविड-१९ चा प्रादुर्भाव सुरु झाल्याने अंगणवाडीमध्ये बालके एकत्र येवून आहार खाण्यामुळे आजाराचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून Social Distancing ठेवण्याच्या उद्येशाने लाभार्थ्यांना अंगणवाडीत दिला जाणारा गरम ताजा आहार बंद करुन त्याऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार संपूर्ण उस्मानाबाद जिल्हयात कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा महाराष्ट्र स्टेट को-ऑप कंन्झ्युमर्स फेडरेशन यांचेमार्फत लाभार्थ्यांना वाटप करण्यात येत आहे.

(२) ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना आहार पुरवठा करण्यासाठी पर्यायी व्यवस्थेंतर्गत महिला संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. तथापि या लाभार्थ्यांना नियमित आहार पुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायत/ग्रुप ऑफ पंचायत असे गट तयार करुन जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीमार्फत महिला मंडळ/बचतगट नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील बालकांना योग्य आहार मिळत नसल्याबाबत

**(१७) ३५८७ (०२-०६-२०२०). श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९७ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी समाजातील बालकांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू थांबविण्यासाठी शासनाने टास्क फोर्सची स्थापना करूनही मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात योग्य आहार न मिळाल्यामुळे १८४ बालके कुपोषित होऊन त्यांचा जीव धोक्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान महिला व बालविकास विभागाने आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयातून घेतलेल्या आढाव्यातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू कुपोषित बालकांचे कुपोषणाचे विनाविलंब निराकरण करुन त्यांच्या आरोग्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) CAS च्या अहवालानुसार जनरेट होणाऱ्या SAM बालकांची आकडेवारीची अंगणवाडी स्तरावर वजन, उंची व वय या बाबींची तपासणी करुन वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्याबाबत जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि), जिल्हा परिषद यांना सूचना देण्यात आल्या असून SAM बालक असल्याची खात्री पटल्यावर त्यांना तात्काळ ग्राम बालविकास केंद्रात दाखल करुन सर्व सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कुपोषित बालकांना पोषक आहार देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

(१) ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी व गरोदर स्तनदा माता यांना घरपोच आहार नियमितपणे देण्यात येत आहे.

(२) सद्य:स्थितीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येत आहे.

(३) तसेच अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्तनदा मातांना चौरस आहार देण्यात येत आहे व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ वेळा अंडी, केळी सुध्दा देण्यात येत आहेत.

ठाणे जिल्हयातील प्रकल्पांमध्ये कुपोषित बालकांना ग्राम बालविकास केंद्रामध्ये दाखल करण्यात येवून योग्य तो आहार (अमायलेज रिच फुड) देण्यात येवून वैद्यकीय उपचार तसेच औषधोपचार करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील धरणांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१८) ३५९२ (२९-०५-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पूर्ण झालेल्या १ हजार ८०० धरणांपैकी ८३० धरणांची डागडूजी व दुरूस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणात जवळपास ५२० लहान मोठी धरणे असून त्यापैकी २५ धरणांमधून गळती होत असल्यामुळे या धरण परिसरामध्ये धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोकणातील २५ धरणांसह राज्यातील नादुरूस्त धरणांच्या दुरुस्तीसाठी किती निधीची आवश्यकता आहे व आवश्यक निधी उपलब्ध करुन धरणांच्या दुरुस्तीबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

धरण सुरक्षितता संघटनेमार्फत दि.०६/०६/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या वार्षिक धरण स्थिती अहवाल सन २०१८-२०१९ मध्ये वर्ग-१ चे २६५ धरणे, व वर्ग-१ चे १०९४ धरणे असे एकूण १३५९ धरणांची तपासणी केलेली असून वर्ग-१ चे १७१ धरण व वर्ग-२ चे ८८५ असा एकूण १०५६ धरणांवर दुरुस्ती आवश्यक आहे.

तसेच, धरण सुरक्षितता संघटनेमार्फत वार्षिक धरण स्थिती अहवाल सन २०१९-२०२० प्रसिध्द करण्यात आला. त्यामध्ये वर्ग-१ चे २७० धरणे व वर्ग-२ चे ११२८ धरणे असे एकूण १३९८ धरणांची तपासणी केलेली असून वर्ग-१ चे २४७ धरण व वर्ग-२ चे ९७७ अश्या एकूण १२२४ धरणांवर दुरुस्ती आवश्यक आहे.

राज्यातील वर्ग-१ च्या २ धरणांमध्ये (१-कोकण तिल्लारी मेन) १-उत्तर महाराष्ट्र (सारंगखेडा बॅरेज) संवर्ग १ च्या उणिवा आढळून आलेल्या आहेत. सदर उणिवा यांत्रिकी संघटनेमार्फत धरण व्दारे निरीक्षणात निर्देशनास आणलेल्या असून क्षेत्रिय कार्यालयाना अवगत करण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या दिनांक ६/७/२०१९ च्या पत्रान्वये सर्व कार्यकारी संचालक व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांना पूर्ण झालेल्या धरणांची पुनश्च: तपासणी करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पुनश्च: तपासणी केलेल्या २४८६ प्रकल्पांपैकी गळती नसलेले १९२४ किरकोळ गळती असलेले ५३० व गंभीर गळती असलेले ३२ प्रकल्प आढळून आले आहेत.

(२) धरण सुरक्षितता संघटनेमार्फत वार्षिक धरण स्थिती अहवाल सन २०१९-२०२० कोकण प्रदेशासाठी प्रसिध्द करण्यात आला. त्यामध्ये वर्ग-१ चे ३९ धरणे व वर्ग २ चे १११ अशा एकूण १४३ धरणांवर दुरूस्ती आवश्यक आहे.

दिनांक ६/७/२०१९ अन्वये सर्व कार्यकारी संचालक व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांना पूर्ण झालेल्या धरणांची पुनश्च: तपासणी करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले होते. त्यानुसार कोकण प्रादेशिक विभागात पुनश्च: तपासणी केलेल्या १६७ प्रकल्पांपैकी गळती नसलेले ६७ किरकोळ गळती असलेले ८९ व गंभीर गळती असलेले ११ प्रकल्प (तळवडे,

कोंडीवली, तेलेवाडी, वाघ, इनामबारी, आड जातेगाव, भातसा, वांद्री मोरबे,खेरे) आढळून आले आहेत. सद्य:स्थितीत तिल्लारी मेन प्रकल्पातील संवर्ग-१ प्रकारातील त्रुटीचे निराकरण करण्यात आलेले आहे.

(३) राज्यातील वर्ग-१ च्या २ धरणांमध्ये (१-कोकण तिल्लारी मेन) १-उत्तर महाराष्ट्र (सारंगखेडा बॅरेज) संवर्ग १ च्या उणिवा आढळून आलेल्या आहेत. सदर उणिवा यांत्रिकी संघटनेमार्फत धरण व्दारे निरीक्षणात निर्देशनास आणलेल्या असून क्षेत्रिय कार्यालयाना अवगत करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी तिल्लारी मेन प्रकल्पातील संवर्ग-१ प्रकारातील त्रुटीचे निराकरण करण्यात आलेले आहे. राज्यातील पूर्ण झालेल्या सिंचन प्रकल्पाची सर्वगांने तपासणी करुन केंद्र शासन व जागतिक बँक अर्थसहाय्यित धरण पुर्नस्थापना व सुधारणा प्रकल्प Dam Rehabilitation & Improvement Project DRIP II & III अंतर्गत प्रदेश निहाय कोकण-१६ प्रकल्प, पुणे-२८ प्रकल्प, औरंगाबाद-३३ प्रकल्प नाशिक-२९ प्रकल्प, अमरावती-२२ प्रकल्प, नागपूर-१२ प्रकल्प असे एकूण १४० प्रकल्पांना रु. ९४० कोटी निधीच्या माध्यमातून घेण्याचे नियोजन असून लवकरच या योजनेंतर्गत धरणांची पुनर्स्थापना कामे सुरु होणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तिलारी (ता.दोडा मार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील धरणासाठी रिंग रोड तयार करण्याबाबत

**(१९) ३६३४ (०२-०६-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-गोवा राज्याच्या संयुक्त विद्यमाने तिलारी (ता.दोडा मार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे आंतरराज्य प्रकल्प उभारण्यात आला असून या धरणामुळे आठ गावे विस्थापित झाल्याने या धरणाच्या पाणलोट क्षेत्र आणि धरणाच्या दोन्ही बाजूने धरणग्रस्तांच्या बुडीत क्षेत्रातील बाहेर असलेल्या जमिनीत

जाण्यासाठी जलसंपदा विभागाच्यावतीने रिंग रोड तयार करण्यासाठी कागदोपत्री कोट्यवधी रूपये खर्च दाखविला परंतु प्रत्यक्षात रिंग रोड पूर्ण झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तिलारी धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीपैकी शेकडो एकर जमिनीवर खाजगी लोक व परप्रांतिय यांनी अतिक्रमण केले असून सदर अतिक्रमण निष्कासित करण्यात आले नसून तिलारी येथील कार्यालय बंद करण्यात आले व येथील कार्यभार सावंतवाडी कालवा विभाग, चराठा सावंतवाडी येथे गेल्यानंतर धरण परिसरातील गैरकारभार वाढीस लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिलारी धरणासाठी संपादित केलेल्या शेकडो एकर जमिनीवर खाजगी लोक व परप्रांतिय यांनी केलेले अतिक्रमण निष्कासित करून जमिनी शासनाच्या ताब्यात घेण्याच्यादृष्टीने कोणतीही कारवाई न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, रिंग रोड तयार करण्यासाठी कोट्यवधी रूपये खर्च करूनही रिंग रोड न झाल्यामुळे तसेच संपादित केलेल्या जमिनीवरील अतिक्रमण दूर करण्यास केलेल्या विलंबाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

तिलारी पाटबंधारे प्रकल्प हा महाराष्ट्र राज्य व गोवा राज्यामधील संयुक्त प्रकल्प आहे. तिलारी जलाशयाच्या डाव्या तीरावरील ३१ कि.मी. पैकी ६ कि.मी. पर्यायी काटरस्ता सद्य:स्थितीत वापरात आहे. तसेच जोड रस्त्याचे वनक्षेत्र वगळता ५ पैकी ४ कि.मी.चे काम पूर्ण आहे.

उजव्या तीरावरील १०.०० कि.मी. मंजूरी प्राप्त लांबीच्या रस्त्याचे अंशत: मातीकाम पूर्ण करण्यात आलेले आहे.

सदर काटरस्ता रिंगरोडसाठी खर्च करण्याबाबत गोवा राज्याने आक्षेप घेतल्यामुळे उर्वरीत कामे प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

तिलारी प्रकल्पाच्या अंशत: बाधित केंद्रे ब्रु. व केंद्रे खुर्द या दोन गावाचे खास बाब म्हणून संपादन केलेले बुडीत क्षेत्राबाहेरील ७८.६० हे.क्षेत्र अन्य पाटबंधारे प्रकल्पांकरीता वन विभागाकडे प्रक्रियेखाली आहे. हस्तांतरणाच्या क्षेत्राबाबत १०९.९५ हे. जमीन जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना कळविण्यात आले असून त्यापैकी १०.६० हे जमीन पर्यटन विभागाकडे हस्तांतरीत करणेत आली आहे.

तिलारी प्रकल्पाचे धरण व अनुषंगिक कामे पूर्ण झाल्याने दिनांक २२/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये तिलारी शिर्ष कामे विभाग क्र.१ कोनाळकट्टा ४ उपविभागीय कार्यालयासह जळगाव येथे वर्ग करण्यात आला. त्यामुळे धरण व अनुषंगिक कामासह तिलारी प्रकल्पाचा संपूर्ण कार्यभार चराटा-सावंतवाडी येथील सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभागाकडे वर्ग केला असून सद्य:स्थितीत धरण देखरेख व नियंत्रण ठेवणेकरीता, ५ उपविभागीय कार्यालये कार्यरत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोषण आहार पुरवठा योजनेंतर्गत पुरविण्यात येणारे खाद्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(२०) ३६५८ (०१-०६-२०२०). श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर १८ संस्था व बचत गटांचे निविदा रद्द करून नवीन व्यवस्थेमार्फत महिला, स्तनदा माता, कुपोषित बालक, किशोरवयीन मुली आदींच्या पोषण आहारासंदर्भात पुरवठा योजनेंतर्गत पुरविण्यात येणारे खाद्य हे निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्यादित, मुंबई व एकात्मिक बालविकास योजना यांच्यातील कराराचे उल्लंघन होत असून पोषण आहाराचे वाटप चुकीच्या व त्रयस्थ संस्थेमार्फत केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनिकेत ट्रेडिंग कंपनी, वंदना कॉटन कंपनी व इतर सर्व संस्थांनी कराराचे उल्लंघन करत मूग, मसूर व अन्य कडधान्यांऐवजी हरभरा वाटप केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या कंपन्यांविरुध्द कारवाई करुन महिला, स्तनदा माता, कुपोषित बालक व किशोरवयीन मुली आदींना पोषण आहार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०)** : (१) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६/०२/२०१९ च्या आदेशानुसार दिनांक ८ मार्च, २०१९ पासून १८ संस्थांचे काम रद्द करण्यात आले असून लाभार्थी आहारापासून वंचित राहू नये म्हणून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १० दिवसांच्या आत आहार पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था करावयाची असल्याने मा.उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्यादित, मुंबई यांना दिनांक ३० एप्रिल,२०१९ पासून आहार पुरवठ्याच्या पर्यायी व्यवस्थेंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाच्या पुरवठ्याचे काम देण्यात आले आहे. त्यानुसार ग्राहक महासंघामार्फत आहार पुरवठ्याचे काम नियमितपणे सुरु आहे. यानुसार पुरवठा झालेल्या कच्चे धान्य व किराणा मालामध्ये कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.

आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी फक्त महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्यादित, मुंबई यांचेशी करारनामा केला असून इतर कोणत्याही त्रयस्थ संस्थेशी करारनामा केलेला नाही. करारनाम्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्यादित, मुंबई यांचेमार्फत आहार पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत असलेल्या पर्यवेक्षिकांवरील अन्याय दूर करण्याबाबत

**(२१) ३९२६ (१७-०७-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ४१४१६ ला दिनांक ५ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्राच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करण्यासाठी क्षेत्रियस्तरावर काम करणाऱ्या सुमारे चार हजार मुख्यसेविका (पर्यवेक्षिका) पदोन्नती मागील पंधरा वर्षापासून बंद करण्यात आल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला बालविकास विभागाने पदोन्नतीचा मार्ग बंद केल्याने पात्रता आणि उच्च शिक्षण असतानाही सदरहू कर्मचाऱ्यास सद्य:स्थितीत असलेल्या पदावर निवृत्त होईपर्यंत काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडीच्या मुख्यसेविकांच्या बदल्या बंद करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पर्यवेक्षिकांवरील अन्याय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२०-०८-२०२०) :** (१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंमधील या विभागाच्या अधिपत्याखालील नागरी प्रकल्पातील मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांची ६२१ पदे मंजूर आहेत तर उर्वरित ग्रामीण प्रकल्पातील पर्यवेक्षिकांची पदे ही ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखाली आहेत. या मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांना या विभागातील बालविकास प्रकल्प अधिकारी व तत्सम पदे या गट-ब संवर्गामध्ये निवडीने नियुक्तीकरीता इतर सर्व संवर्गासह योग्य प्रतिनिधित्व देण्यात येत असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

(२) मुख्यसेविकांच्या पदोन्नतीचा मार्ग बंद झालेला नाही. १०४ नागरी प्रकल्पातील पदोन्नतीस पात्र मुख्यसेविकांना परिविक्षा अधिकारी या पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून सद्या सुरु आहे.

(३) मुख्यसेविकांच्या बदल्या बंद झालेल्या नाहीत. बदली संदर्भात सामान्य प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या परिपत्रकानुसार जुनी पेन्शन योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबत

**(२२) ३९४२ (१७-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने त्यांच्या सेवेमध्ये दिनांक १ जानेवारी, २००४ रोजी किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना शासन अधिसूचना दिनांक २२ डिसेंबर, २००३ अन्वये लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या वरील नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १ जानेवारी, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तीवेतन योजना शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ व दिनांक ३१ नोव्हेंबर, २०१० अन्वये लागू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक ११ जून, २०२० च्या परिपत्रकान्वये दिनांक १ जानेवारी, २००४ ते दिनांक २८ ऑक्टोबर, २०१० या दरम्यान शासकीय सेवेत रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाच्या शर्तीवर राज्य शासनाने दिनांक १ नोव्हेंबर, २००५ ते दिनांक २८ ऑक्टोबर, २०१० या दरम्यान शासकीय सेवेत रूजू झलेल्या कर्मचाऱ्यांना जुन्या पेंशन योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरविणे घटनात्मकदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या अत्यावश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वा नसल्यास जुन्या पेन्शन योजनेचा लाभ केंद्र शासनाच्या दिनांक ११ जून, २०२० च्या परिपत्रकानुसार दिनांक २८ ऑक्टोबर, २०१० पर्यंत नियुक्त झालेल्या राज्यातील शासकीय/निमशासकीय जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका कर्मचारी व अनुदानित, अंशत: अनुदानित शाळा/महाविद्यालयातील शिक्षक/प्राध्यापक/कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरविण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, याबाबत शासन केव्हापर्यंत निर्णय घेणार आहे ?

**श्री.अजित पवार (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्य शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ व त्यानंतर नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. तथापि, दिनांक ३१ नोव्हेंबर २०१० रोजी कोणताही शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही.
(३) हे खरे नाही. केंद्र शासनाच्या दिनांक ११ जून, २०२० च्या परिपत्रकान्वये दिनांक ०१/०१/२००४ पूर्वी तांत्रिक राजीनामा देऊन दिनांक ०१/०१/२००४ ते दिनांक २८/१०/२००९ दरम्यान राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) अंतर्गत नवीन सेवेत रुजू झाले असतील केवळ अशा कर्मचाऱ्यांनाच पूर्वीच्या सेवेचा लाभ देऊ केला आहे. जुन्या निवृत्तीवेतन योजनेचा लाभ दिनांक ०१/०१/२००४ ते दिनांक २८/१०/२००९ या कालावधीत नियुक्त सरसकट सर्व कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय केलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) याबाबत शासनाने कोणताही निर्णय घेतला नाही तसेच सद्य:स्थितीत कोणताही निर्णय घेणे प्रस्तावित नाही.

---

## आयुर्वेदिक डॉक्टरांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(२३) ३९५८ (१७-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, अॅड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाबाधित रुग्णांना उपचार देणाऱ्या अॅलोपॅथी डॉक्टरांना रुपये ८०,०००/- तर आयुर्वेदिक डॉक्टरांना केवळ रुपये २४,०००/- दरमहा मानधन देण्यात येत असल्याने अॅलोपॅथी व आयुर्वेदिक डॉक्टरांच्या कामात कोणताही फरक नसताना आयुर्वेदिक डॉक्टरांना कमी मानधन दिल्याने आयुर्वेदिक डॉक्टरांच्या मानधनात भेदभाव व अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे १२ वर्षाहून अधिक काळापासून आदिवासी, नक्षली तसेच दुर्गम भागात काम करणारे सदरहू भरारी पथकातील आयुर्वेदिक डॉक्टर मागील तीन महिन्यापासून कोरोना बाधित रुग्णांना नियमित उपचार देत असून त्यांच्या मानधनात होत असलेला अन्याय दूर करण्याच्या मागणीचे एक निवेदन मा.मुख्यमंत्र्यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आयुर्वेदिक डॉक्टरांच्या मानधनाच्या मागणीबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०८-२०२०) :** (१) अॅलोपॅथी डॉक्टरांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या, आयुर्वेदिक डॉक्टरांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या भिन्न असल्याने वेतनातील तफावत दिसून येते. शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये कंत्राटी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मानधनात रुपये ४०,०००/- पर्यंत वाढ केली आहे.

(२) मानधन वाढीबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) भरारी पथकाची स्थापना व कर्तव्य वर्षातील ठराविक कालावधीसाठीच्या मर्यादेत आहे. सदर पथकातील वैद्यकीय अधिकारी मानसेवी असून त्यांच्या मानधन वाढीबाबत गाभा समितीच्या निर्णयानुसार मानधन वाढीचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

## कोरोना संक्रमणाच्या काळात लहान मुलांच्या लसीकरणात घट होत असल्याबाबत

**(२४) ४०१८ (१७-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवजात जन्म झालेल्या बाळाला बीसीजी, काविळ व पोलिओ लस दीड, अडीच व साडे तीन महिन्याला देण्यात येणाऱ्या ट्रिपल, हिब, हेपॅटाइटिस बी, रोटा, न्यूमोनिया या लसी वेळापत्रकानुसार घ्याव्या लागतात, सहा महिने पूर्ण झाल्यावर इन्फ्लूएंजा प्रतिबंधक लसीची दोन इंजेक्शन (महिन्याच्या अंतराने) देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संक्रमणाच्या काळात पालकांच्या मनात घरातून बाहेर पडणेबाबत असलेली भिती, लॉकडाऊनमुळे वाहनांची उपलब्धता, दवाखाने बंद असणे अशा परिस्थितीत लसीकरण वेळापत्रकानुसार न होता विस्कळीत होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लसीकरण हा बाळाच्या संगोपनाचा महत्त्वाचा घटक असल्यामुळे बाळाचे लसीकरण विस्कळीत न होता वेळेत होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२८-०७-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियमित लसीकरण कार्यक्रम अंतर्गत लसीकरण वेळापत्रकानुसार जन्मत: हिपॅटायटिस बी, पोलिओ, बीसीजी, तसेच त्यानंतर पेन्टाव्हायलन्ट १,२,३, ओरल पोलिओ १,२,३, रोटा व्हायरस १,२,३, आय.पी.व्ही. १,२, गोवर रुबेला लस एक वर्ष पूर्ण होईपर्यंत देण्यात येते. तसेच दीड वर्षामध्ये डी.पी.टी व पोलिओ बुस्टर तसेच गोवर रुबेला या लसी दिल्या जातात.

परंतू महाराष्ट्र राज्यात नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत सहा महिने पूर्ण झाल्यावर इन्फ्लुएंजा प्रतिबंधक लसीची दोन इंजेक्शन (महिन्याच्या अंतराने) लसी दिली जात नाही.

(२) होय, हे अंशतः खरे आहे

ज्या भागामध्ये कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी आहे त्या ठिकाणी लसीकरण सेवेवर फारसा परिणाम झालेला नाही तथापि, ज्या कार्यक्षेत्रामध्ये कोविड-१९ प्रादुर्भाव जास्त असल्यामुळे Containment Zone मध्ये लसीकरण कामावर परिणाम झाल्याचे दिसून येते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

केंद्र शासनाकडून कोविड-१९ लसीकरण सत्राबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना नुसार लसीकरण सत्र कसे राबवावे व बालकांना लसीकरण कसे करावे याबाबत मार्गदर्शक सूचना जिल्हयांना व महानगरपालिकांना देण्यात आल्या आहेत त्याप्रमाणे कोविड-१९ चे संक्रमण जास्त असलेल्या कंटेनमेन्ट झोनमध्ये लसीकरण सेवा विस्कळीत झाली आहे. परंतु ग्रीन झोन असणाऱ्या सर्व आरोग्य संस्थांमध्ये शीतसाखळी अबाधित ठेवून व लाभार्थ्यांमध्ये योग्य ते अंतर ठेवून कोविड-१९ आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनाची काळजी घेवून नियोजन बध्द पध्दतीने लसीकरण करण्यात येत आहे.

---

## कोंढाणे धरण (ता.कर्जत, जि.रायगड) प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत

**(२५) ४०६६ (१७-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढाणे धरण प्रकल्प (ता.कर्जत, जि.रायगड) सन २०११ मध्ये शासनाने मंजूर केला व त्यानंतर धरणाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली, परंतु प्राथमिक अवस्थेत काही राजकीय पक्षांनी या धरणाचे कामात अनियमितता झाल्याचे कारण सांगून या धरणाचे काम बंद पडले, त्यानंतर शासनाने हा प्रकल्प सिडकोला देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०२० च्या पहिल्या आठवड्यात विधानभवनातील मा.मुख्यमंत्री यांच्या दालनात रायगड जिल्ह्यातील आमदारांच्या विविध प्रश्नांवर विचार विनिमय करण्यासाठी बैठक बोलावली होती, त्यावेळी कर्जत तालुक्यातील कोढाणे धरण प्रकल्पाचा मुद्दा आला असता, कोढाणे धरणावर आधी कर्जत तालुक्याचा अधिकार असून, त्यानंतर योग्य मोबदला देऊन ते सिडकोला दिले जाईल. मात्र त्याआधी प्रकल्पग्रस्त यांचे पुनर्वसन, जागेचा मोबदला हे प्रश्न मार्गी लावावे लागतील. त्यासाठी स्थानिक आमदार यांचे मार्गदर्शन घेण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्र्यांनी दिल्या असून त्यावर सिडको सकारात्मक नसेल, तर वेगळा विचार शासन करेल, असे निर्देशही मा.मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोंढाणा धरण सिडकोला वर्ग करण्याबाबत चर्चा झाली असता, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांना मा.मुख्यमंत्री यांनी प्रकल्पग्रस्त यांच्या सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्र्यांनी कोंढाणे धरण प्रकल्पासंदर्भात दिलेल्या निर्देशानुसार सिडकोने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०७-२०२०) :** (१) होय.

शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांक संकीर्ण २०१६/(३१२/१६)/ २०१६ खारभूमी दिनांक १८/०८/२०१७ च्या शासन निर्णयानुसार आणि शासन शुध्दीपत्रक दिनांक ०४/१०/२०१७ अन्वये कोंढाणे धरण प्रकल्प सिडको लिमिटेड सिडको भवन बेलापूर यांना हस्तांतरित करणे बाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(२), (३), (४) माहे मार्च, २०२० च्या पहिल्या आठवड्यात विधानभवनातील मा.मुख्यमंत्री यांच्या दालनात रायगड जिल्ह्यातील आमदारांच्या विविध प्रश्नांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलाविलेल्या बैठकीचे कार्यवृत्त या विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रूग्णालयातील बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत

**(२६) ४१५० (१७-०७-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णय दिनांक ७ डिसेंबर, २०१५ अन्वये विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रूग्णालयातील ६२६ बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला असूनही सर ज.जी.समूह रूग्णालय, मुंबई या संस्थेतील अनेक वर्षापासून सेवा देणाऱ्या बदली कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांना आजमितीस शासकीय सेवेत कायमस्वरूपी समाविष्ट करून न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मुंबईतील सेंट जॉर्ज, जी.टी. व जे.जे. रुग्णालयातील चतुर्थश्रेणी बदली कर्मचाऱ्यांनी शासन सेवेत सामावून घेण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व बदली कर्मचाऱ्यांनी अनेकवेळा शासनाकडे निवेदन/मागणी/आंदोलन करुनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रूग्णालयातील बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२८-०७-२०२०) :** (१) व (२) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील विविध संस्थांमध्ये एकूण ९२५ बदली कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी ज्या कर्मचाऱ्यांची सेवा दिनांक ०७/१२/२०१५ च्या शासन निर्णयानुसार

न्यायालयाच्या आदेशाशिवाय सलग १० वर्षे व प्रत्येक आर्थिक वर्षात २४० दिवस सेवा झाली आहे, अशा कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) व (४) वरीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाचे विद्यार्थी शुल्क प्रतिपूर्तीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(२७) ४१७७ (१७-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गतवर्षी वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी मराठा आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी लागू केलेल्या आरक्षणाच्या गोंधळामुळे खाजगी महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागलेले वैद्यकीय अभ्यासक्रमाचे अडीचशेहून अधिक विद्यार्थी शुल्क प्रतिपूर्तीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षणाच्या गोंधळामुळे व सातत्याने बदललेल्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांपुढे गोंधळ निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या किती विद्यार्थ्यांना सदरहू शुल्काची प्रतिपूर्ती केली व उर्वरित विद्यार्थ्यांना किती कालावधीत सदरहू शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शुल्क प्रतिपूर्ती देण्याबाबत निर्णय घेऊन प्रतिक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२८-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागास प्रवर्ग (SEBC) या दोन प्रवर्गासाठी नव्यानेच आरक्षण लागू करण्यात आले होते. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील ज्या उमेदवारांना शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालयात प्रवेश प्राप्त झाला असता, अशा काही विद्यार्थ्यांना खाजगी महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागला. वैद्यकीय/दंत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अशा विद्यार्थ्यांची संख्या ही एकूण ११२ इतकी आहे. यापैकी पदवी अभ्यासक्रमाच्या ३५ विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ५० टक्के शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी १० टक्के व सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गास १२ टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे.

(३) व (४) शासन निर्णय दिनांक २० सप्टेंबर, २०१९ अन्वये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृटष्या मागास प्रवर्ग (SEBC) आरक्षणामुळे बाधित झालेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याबाबत तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## महिला बचतगटांच्या कर्जावरील व्याज माफ करणेबाबत

**(२८) ४२३२ (१७-०७-२०२०). श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात सुमारे साडेचार हजार नोंदणीकृत बचतगट असून यात महिला आर्थिक विकास महामंडळाकडे नोंदणी केलेले सुमारे ६०० बचतगट तर ग्रामीणमध्ये २ हजार बचतगट आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरातील विविध बँकाच्या माध्यमातुन अंदाजे रुपये २९ कोटी कर्ज सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात महिला बचतगटांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बचतगटांच्या बहुतांश महिला वाळवणीचे पदार्थ तयार करुन विक्री करण्याचे व्यवसाय करणाऱ्या असल्याने लॉकडाऊनच्या काळात या महिलांचा व्यवसाय संपूर्णपणे बंद पडल्यामुळे महिलांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची रक्कम वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू महिला बचतगटाच्या महिलांनी घेतलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२७-०८-२०२०)** : (१) हे खरे आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद अंतर्गत कार्यरत लोकसंचलीत साधन केंद्रांव्दारे (सी.एम.आर.सी.) औरंगाबाद शहरात दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY NULM) अंतर्गत ६१४ बचत गट व अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत ३१९ बचत गट स्थापन करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे जिल्हयातील नगरपरिषद क्षेत्रात ४७३ बचत गट स्थापन केलेले आहेत. याशिवाय ग्रामीण भागात १,९४१ बचत गट स्थापन करण्यात आलेले आहेत. जिल्हयात महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत कार्यरत सी.एम.आर.सी. मध्ये एकूण ३,३४७ महिला बचत गट स्थापन तथा नोंदणीकृत आहेत.

(२) हे खरे आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात ग्रामीण व शहरी भागातील विविध बँकांनी १,३२१ माविम स्थापित सी.एम.आर.सी. तील महिला बचत गटांना रुपये २९,१३,००,०००/- इतक्या रकमेचे कर्ज दिलेले आहे.

(३) औरंगाबाद जिल्हयातील बचत गटातील बहुतांश महिलांनी शेती व शेतीवर आधारित व्यवसायासाठी कर्ज घेतलेले आहे. जिल्हयातील ३,३४७ महिला बचत गटातील १९१ महिला जोडव्यवसाय म्हणून वाळवणीचे पदार्थ तयार करतात. वाळवणीचे पदार्थ हे त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन नाही. त्यामुळे लोकडाऊन काळात त्यांच्या व्यवसायावर मोठ्या प्रमाणावर विपरीत परिणाम झालेला दिसून येत नाही.

एप्रिल ते जुलै कालावधीत बँक कर्ज घेतलेल्या ७२% महिलांनी नियमित कर्जफेड केली आहे. उर्वरित २८% महिलांनी अधिस्थगन (Moratorium) ची सुविधा घेतलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बेलोरा सर्कल (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे तलाव बांधण्याबाबत

**(२९) ४२४२ (१७-०७-२०२०). श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेलोरा सर्कल (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील शेतकरी गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून तलावाची मागणी करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेलोरा शहरात नवीन तलावाची आवश्यकता असल्यामुळे त्या तलावाचा फायदा सत्तरमाळ, आसोला, रोहडा व बेलोरा या चार गावातील शेतकऱ्यांना होणार असून सदर तलावाकरीता पंधरा ते वीस वर्षापासून मागणी करूनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सत्तर माळ मारवाडी (खुर्द) या भागात एक तलाव असून हा तलाव पन्नास वर्षापूर्वीचा असून तलावात गाळाचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेलोरा शिवारात नवीन तलाव बांधण्याबाबत तसेच सत्तर माळ मारवाडी (खुर्द) या भागातील तलावाचा गाळ काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१८-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर तलावाकरीता सन २०१८-२०१९ या वर्षात मागणी प्राप्त झाली होती, त्या अनुषंगाने जि.प. उप विभाग, पुसद यांचेमार्फत बेलोरा या गावातील प्रकल्प ठिकाणाची प्राथमिक स्थळ पाहणी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

बेलोरा शहरात नवीन तलावाची मागणी करण्यात आलेल्या प्रकल्प ठिकाणाची प्राथमिक स्थळ पाहणी करण्यात आली असता, तलावाचे ठिकाणी पाण्याची आवक क्षमता कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या तलावाचा फायदा सत्तरमाळ, आसोला, रोहडा व बेलोरा या चार गावातील शेतकऱ्यांना होईल असे निश्चितपणे म्हणता येणार नाही, तथापि, पाझराव्दारे पाणी पातळीत वाढ होऊन अप्रत्यक्षरित्या फायदा होऊ शकतो.

(३) अंशत: खरे आहे,

सदर तलावामध्ये काही प्रमाणात गाळ आहे. सदर तलावात काही प्रमाणात गाळ असला तरी दरवर्षी या तलावामध्ये पाणीसाठा होत असून त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा परिसरातील शेतकऱ्यांना होत आहे.

(४) बेलोरा येथील मागणी असलेल्या तलावाचे सविस्तर सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्याचे निदेश जि.प. उप विभाग, पुसद यांना देण्यात आले आहेत.

सत्तरमाळ येथील तलावामधील गाळ काढण्याचे कामाचे, गाळ मुक्त धरण गाळ युक्त शिवार योजनेंतर्गत प्राकलन बनवून मंजूरी घेण्यात आली व प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आली. परंतु सदर तलाव असलेला परिसर वन विभागाच्या अधिनस्त असल्यामुळे गाळ काढून वाहतूक करण्याकरीता वन विभागामार्फत परवानगी मिळाली नाही. त्यामुळे काम थांबविण्यात आले आहे. वन विभागाची परवानगी प्राप्त झाल्यास सत्तरमाळ येथील तलावातील गाळ काढण्याची कार्यवाही करता येईल.

तसेच मारवाडी (खुर्द) या ठिकाणी गावालगत गांव तलाव अस्तित्वात असून दरवर्षी सदर तलावामध्ये पाणीसाठा होत असतो. सदर तलावामधून गाळ काढण्याकरीता मागणी प्राप्त नसल्यामुळे गाळ काढण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश देताना प्रादेशिक आरक्षण व कोटा पध्दत रद्द करण्याबाबत

**(३०) ४२४४ (१७-०७-२०२०). श्री.सुरेश धस : दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४१४१८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन NEET च्या माध्यमातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी संपूर्ण देशात एकाच अभ्यासक्रमावर आधारीत परीक्षा घेत असताना राज्यात मात्र ७०:३० चा कोटा राबवला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अन्यायकारक कोट्यामुळे राज्यात प्रादेशिक वाद निर्माण होत आहे, या कोट्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील मुलांना कमीत कमी गुणांवर ज्या जागांवर प्रवेश मिळतो त्या गुणवत्तेपेक्षा जास्त गुण असतानाही मराठवाड्यातील अनेक मुले वंचित राहत असून अशा मुलांची संख्या जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुणवत्तेत अव्वल असूनही ७०:३० च्या कोट्यामुळे मराठवाड्यातील मुलांना मुंबईतील जे.जे.मेडिकल कॉलेज, सायन मेडिकल कॉलेज, बीजे पुणे येथे प्रवेश मिळत नसल्याने प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी ७०:३० चा अन्यायकारक कोटा रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२८-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

अखिल भारतीय कोटा/जीओआय/व्यवस्थापन कोटयासाठीच्या १५ टक्के जागा वगळून उर्वरित ८५ टक्के जागांपैकी वैधानिक विकास मंडळनिहाय ७० टक्के जागा स्थानिक विद्यार्थ्यांसाठी व ३० टक्के जागा राज्यस्तरीय विद्यार्थ्यांसाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. या ३० टक्के जागांसाठी सर्व मंडळातील विद्यार्थी प्रवेश मिळण्यासाठी पात्र आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

मराठवाड्यापेक्षा उर्वरित महाराष्ट्रामध्ये वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या जास्त असल्यामुळे ७० टक्के कोटयातून उर्वरित महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना जास्तीच्या जागा उपलब्ध होतात.

(३) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्रमांक १२५६७/२०१६ ही न्यायप्रविष्ट आहे. परंतु, उक्त कोटा पध्दत रद्द करण्याच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिमत प्राप्त करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करण्याबाबत

**(३१) ४२६२ (१७-०७-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ६९२ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत नियुक्त तज्ञ समितीव्दारे परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापनेच्या अनुषंगाने तपासणी करुन प्राथमिक अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सुरु असलेली आवश्यक कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही.

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३२) ४२६३ (१७-०७-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील बहुतांशी कामे अधिकारी, कंत्राटदार यांच्यातील हितसंबंधामुळे पूर्ण होऊ शकली नसल्याने प्रलंबित असलेल्या सर्व कामांची चौकशी करून दोषींविरूध्द कारवाई करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विहित मुदतीत कामे पूर्ण न करणारे कंत्राटदार तसेच कामास गती देण्यास अकार्यक्षम ठरलेल्या संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) लेखी निवेदन दिल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतीची व खोलीची दुरवस्था झाल्याबाबत

**(३३) ४३०४ (१७-०७-२०२०). डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११५७ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांना विविध प्रकारचे निधी शासनाने दिलेले असतानाही अकोला जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतीची व खोल्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची डागडुजी व खोल्यांची दुरुस्ती निधी अभावी प्रलंबित असून शासनाने शाळेच्या विकासाकरीता दिलेला निधीचा प्रशासक, सरपंच, सचिव आदिंच्या संगनमताने गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन शाळेच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाच्या विविध विभागांनी काढलेले कार्यादेश रद्द करण्याबाबत

**(३४) ४३३० (१७-०७-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध विभागांनी दिनांक १५ ते ३१ मार्च, २०२० या कालावधी कार्यादेश काढल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य व देशावर कोरोनाच संकट असताना रुपये ८ ते १० हजार कोटींपर्यंतच्या कार्यादेश काढण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कार्यादेश रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२८-०७-२०२०) :** (१) व (२) महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीनुसार प्रत्येक प्रशासकीय विभागाकडून त्याला सोपविण्यात आलेल्या विषयांबाबत धोरणात्मक निर्णय घेणे, योजना/कार्यक्रम/प्रकल्प यांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे, अर्थसंकल्पीय तरतूद करुन घेणे, कार्यारंभ आदेश देणे किंवा रद्द करणे इत्यादीबाबत कार्यवाही केली जाते. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर दिनांक ३१ मार्च, २०२० पूर्वीच्या खर्चाच्या अनुषंगाने वित्त विभागामार्फत कोणतेही निदेश दिलेले नसल्याने संबंधित विभाग विहित पध्दतीनुसार कार्यवाही करण्यास सक्षम आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कर्मचाऱ्यांसाठी सुरू असलेल्या योजनेतील रक्कम कोविड-१९ राष्ट्रीय आपत्ती निवारणासाठी वापरण्याबाबत

**(३५) ४३३८ (१७-०७-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कर्मचाऱ्यांसाठी सुरू असलेल्या डीसीपीए/एनपीएस योजनेतील रक्कम कोविड-१९ राष्ट्रीय आपत्ती निवारणासाठी वापरण्याबाबत महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेने मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला व निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर निवेदनामध्ये शासनाचे १४% अंशदानाची रक्कम शासनाने वापरावी, त्यामुळे शासनाची आर्थिक अडचण दूर होईल असे म्हटले आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या अंशदानाची १०% रक्कम GPF खात्यात जमा करावी आणि कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करावी असे म्हटले आहे. तथापि, असे करण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही अथवा असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनदीच्या पातळीत घट झाल्याबाबत**

**(३६) ४३३९ (१७-०७-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील अनेक शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या उल्हासनदीच्या पातळीत घट झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच उल्हासनगर आणि कल्याण शहराला पाणीपुरवठा करणारी यंत्रणा सातत्याने बंद पडत असल्याने त्याचा परिणाम पाणीपुरवठ्यावर होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणांमधून पाणीपुरवठा करण्यात आणि पाण्याची पातळी कायम राखण्यात अपयश येत असल्याने सदर परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाण्याची पातळी कायम राखण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०३-०८-२०२०) :** (१) माहे मे, २०२० व तद्नंतर आजपावेतो उल्हासनदीच्या पात्रात मंजूर पाणी आरक्षणानुसार आवश्यक पाण्याची पातळी राखण्यात आलेली आहे.

उल्हासनगर व कल्याण शहराला पाणीपुरवठा करणारी यंत्रणा सातत्याने बंद पडत आहे, हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर परिमंडळांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांसाठी वैद्यकीय अधिकारी पदाची नव्याने भरती करण्याबाबत

**(३७) ४३४८ (३०-०७-२०२०). श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत लातूर परिमंडळांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांसाठी कोविड-१९ या साथरोग नियंत्रण अनुषंगाने १३ कॅडरसाठी जाहिरात नमुना २०२०-२०२१ साठी वैद्यकीय अधिकारी पदांची भरती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील भरती प्रक्रिया राबवली जात असताना निवड समितीमध्ये कोण-कोण होते, भरती प्रक्रिया कशी राबवली गेली, या बाबींमध्ये पारदर्शकता नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिमंडळाच्या संकेतस्थळावर यादी प्रसिध्द करण्यात येऊन त्याच दिवशी हरकती मागवण्यात येतील असे कळवूनही तसे काहीही झाले नाही, तसेच उमेदवारांचे अर्ज दिलेल्या संकेतस्थळावर पोहोचत नाहीत, उलट मेलबॉक्स फुल झाला आहे, आपला अर्ज पोहोचू शकत नाही असे मेसेज आले असल्याने सदरील संपूर्ण भरती प्रक्रिया सदोष व संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर भरती रद्द करुन लातूर परिमंडळातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नव्याने भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कोविड-१९ अंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात १३ संवर्गासाठी भरती करावयाच्या पदांकरीता उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर परिमंडळ लातूर यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शक सूचनेनुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर परिमंडळ लातूर-अध्यक्ष सहाय्यक संचालक (वैद्यकिय) उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर - सदस्य मुख्य प्रशासकीय अधिकारी उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर - सदस्य विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक रा.आ.अ. उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर - सदस्य सचिव उपरोक्त समितीने अर्ज मागविणे, छाननी करणे, शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या आधारे गुणवत्ता निश्चित केली आणि गुणवत्ता यादी पुढील कार्यवाहीसाठी जिल्हयांकडे पाठविली या गुणवत्ता यादीनुसार जिल्हास्तरावरून नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे,

उमेदवारांना अर्ज करण्यासाठी दिनांक १६/०४/२०२० ते दिनांक १८/०४/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत कालावधी देण्यात आला होता. मोठ्या प्रमाणात उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यामुळे ई-मेल इनबॉक्स स्टोरेज कॅपॅसिटी संपल्यामुळे उमेदवारांचे अर्ज प्राप्त होण्याकरीता तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. तरी, वरील तांत्रिक बाबीमुळे दिनांक १८/०४/२०२० रोजीच्या दुपारी २.०० ऐवजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात आला. सुमारे १८००० उमेदवारांचे अर्ज ई-मेलव्दारे प्राप्त झाले होते. सदर अर्ज ई-मेल वरून डाऊनलोड करणे प्रत काढून अर्जाची छाननी व तपासणी करून उमेदवारांची यादी तयार करण्यात आली होती तथापि, कोविड-१९ या साथरोगाच्या प्रार्दुभावामुळे कर्मचारी दैनंदिन कार्यालयीन कामकाजामध्ये व्यस्त असल्याने उमेदवारांची यादी तयार करण्यास विलंब झाला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत

**(३८) ४३८६ (१७-०७-२०२०). डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊनमुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे अनेक निवृत्तीवेतनाचे प्रस्ताव महालेखाकार कार्यालय, मुंबई येथे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक प्रस्ताव जिल्हास्तरावर प्रलंबित असून लॉकडाऊनमुळे कर्मचारी उपलब्ध नसल्याने निवृत्तीवेतनाचे प्रस्ताव न स्वीकारल्यामुळे अनेक कर्मचारी निवृत्तीवेतनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनाचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) कोविड-१९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे वेतन पडताळणी आणि महालेखापाल यांच्याकडून निवृत्तीवेतन प्राधिकारपत्राचे निर्गमन इत्यादी बाबीस विलंब होत असल्यामुळे वित्त विभागाच्या दिनांक १२/५/२०२० च्या शासन परिपत्रकान्वये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तके पडताळणीस तसेच प्राधिकारपत्र निर्गमित करण्यास होणारा विलंब विचारात घेऊन अशा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची आर्थिक गैरसोय होऊ नये म्हणून त्यांना ६ महिने इतक्या कालावधीकरीता तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, वित्त विभागाच्या दिनांक २५/६/२०२० च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नुसार सेवानिवृत्त/मृत शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर करावयाचे तात्पुरते निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन पहिल्या सहा महिन्यानंतर त्यापुढील सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत मंजूर करण्याचे अधिकार “एक विशेष बाब” म्हणून विभाग प्रमुखांस प्रत्यार्पित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बेलेश्वर चौक-पिंपरनई-बांगरवाडा रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३९) ४४२१ (१७-०७-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलेश्वर चौक-पिंपरनई-बांगरवाडा रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून झाले असून दाभाडे वस्ती शेजारी ३०० मीटर डांबरी रस्ता अस्तित्वात नाही, हे खरे आहे काय, तसेच, पिंपरनई, बांगरवाडा गावात रस्त्याच्या बाजूने सिमेंटचा नाला बांधण्याचे निविदेत नमूद असताना नाला बांधण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त रस्त्याच्या बांधकामावेळी खाडीसाठी शासनाची परवानगी न घेता बांगरवाडा ग्रामपंचायत हद्दीत खाडी खदान खोदण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार याबाबत चौकशी समिती नेमून संबंधित कंत्राटदारांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कंत्राटदाराचे परवाने रद्द करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) बेलेश्वर चौक-पिंपरनई-बांगरवाडा या ५.६० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून झाले असून पिंपरनई गावामध्ये दाभाडेवस्ती शेजारी २० मीटर रस्ता शेतकऱ्यांनी अडवल्यामुळे पूर्ण करता आला नाही. सदर लांबी वगळता उर्वरीत लांबीत रस्त्याचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे. तसेच पिंपरनई व बांगरवाडा गावामध्ये सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे कामे करण्यात आले आहे. परंतु अंदाजपत्रकामध्ये रस्त्याच्या बाजुच्या नालीचे काम मंजूर नसल्याने करण्यात आलेले नाही.

(२) सदर रस्त्याच्या बांधकामासाठी शासन मान्यता प्राप्त खदानावरील खडी वापरण्यात आलेली आहे. त्याची Royalty शासनास जमा केलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या कंत्राट देण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४०) ४४२४ (१७-०७-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ चे कार्यकारी अभियंता यांनी रुपये ३ कोटींचे कामे काढून ती ठराविक गुत्तेदारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यात पाटबंधारे उपविभाग, बीड इमारत दुरुस्तीसाठी कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ यांनी रुपये १२ लक्ष रुपयांच्या निधीची एकच निविदा न काढता छोट्या छोट्या रुपये ३ लाखांपेक्षा कमी रकमेच्या ४ निविदा काढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामे विशिष्ट कंत्राटदाराला मिळवून देण्यात येत असल्याने या कामांबाबत एका संस्थेने जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जायकवाडी पाटबंधारे विभाग, बीड क्रमांक ३ ची तक्रार करुनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी ठराविक कंत्राटदारास देण्यात आलेल्या कामांची शासनाने चौकशी करुन सदरहू कंत्राट रद्द करण्याबाबत तसेच गैरव्यवहार करणाऱ्या दोषी कार्यकारी अभियंता व गुत्तेदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड या कार्यालयाने कळविल्यानुसार कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांनी पाटबंधारे उपविभाग, बीड च्या इमारत दुरुस्तीसाठी ३ निविदा काढल्या असून त्याची एकत्रित किंमत रुपये ८.९७ लक्ष इतकी आहे.

(३) होय.

हरित क्रांती पाणी वापर सहकारी संस्था बिंदुसरा तलाव, बीड व इतर यांनी दिनांक १८/०५/२०२० रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे तक्रार केली आहे. यानुषंगाने अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

यानुषंगाने अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात येत असून चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड तालुक्यातील बीड ते लिंबागणेश रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) ४४५८ (१७-०७-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तालुक्यातील बीड ते लिंबागणेश रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात आला असून सदरहू रस्त्यासाठी अवैध खडी केंद्र उभारण्याचे काम सुरु आहे, रस्त्यासाठी वापरण्यात आलेली वाळू याच ठिकाणी असलेल्या पिंपळवाडी येथील नदीतून अवैधरित्या वाळू उपशा करून वापरण्यात आली असून प्रशासनाला वाळू शहागड येथून आणल्याचा खर्च दाखविण्यात आला आहे, तसेच, रस्त्याच्या कडेला मनरेगा अंतर्गत रुपये २५ लक्ष खर्च करुन लावलेली झाडे जेसीबी यंत्राव्दारे काढून फेकून देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात आलेला मुरूम रस्त्याच्या शेजारील शासकीय जमिनीला खोदून वापरण्यात आला असून प्रशासनाला सदरहू मुरुम नाळवंडी येथून आणल्याचे दाखविण्यात आले आहे, तसेच, पालवण ते बेलेश्वर चौक यादरम्यान याच रस्त्यावर ६७ नळकांडी पूल असल्याचे दाखविण्यात आले असून प्रत्यक्षात याठिकाणी २८ नळकांडी पूल आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाळवणी शेजारी बिंदूसुरा नदीवर नवीन पूल बांधणे आवश्यक असताना सदर कंत्राटदाराने जुन्या पुलावरच ६ इंच सिमेंट स्लॅप दाखवत नव्या पुलाचे देयक घेतले, तसेच, पालवन ते बेलेश्वर चौक रस्त्याची जाडी प्रस्तावित टेंडर प्रमाणे ९ इंच असायला हवी मात्र ती ३ इंच आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त गैरव्यवहार संबंधित कंत्राटदार व कार्यकारी अभियंता महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, बीड यांच्या संगनमताने करण्यात आला असल्याने याबाबत एका सामाजिक कार्यकर्त्याने मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मा.पालकमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन दिले असून अनेक वेळा आंदोलन व रस्ता रोको करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-०८-२०२०) :** (१) बीड तालुक्यातील बीड ते लिंबागणेश रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात येत आहे हे खरे आहे. परंतु सदर कामासाठी वापरण्यात आलेली वाळू व खडी शासन मान्यता प्राप्त खदाणी वरील वापरण्यात आली असून त्याची रॉयल्टी शासनास जमा केलेली आहे. तसेच रस्त्याच्या कडेला मनरेगा अंतर्गत लावलेल्या झाडांना कुठलीही बाधा पोहचवलेली नाही.
(२) अंदाजपत्रकात तरतुद असल्यामुळे सदर रस्त्याच्या कामासाठी रस्त्याच्या शेजारील शासकीय जमिनीतील मुरूम वापरण्यात आला आहे. तसेच बीड ते लिंबागणेश या रस्त्यावर एकूण ५६ नळकांडी पुल मंजूर आहेत. परंतु कामाच्या आवश्यकतेनुसार एकूण ४३ नविन नळकांडी पुल बांधण्यात आलेले आहेत व २ जुन्या पुलांना फक्त भिंती बांधण्यात आल्या आहेत व तेवढयाच नळकांडी पुलांचे देयक अदा करण्यात आलेले आहे.
(३) भाळवणी शेजारी बिंदूसुरा नदीवर जुना पुल अस्तित्वात आहे. त्या ठिकाणी नवीन पूल बांधकाम अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट नाही. Structural Auditor च्या सल्ल्यानुसार सदर पुलाची फक्त दुरूस्ती करण्यात येत आहे. व तेवढयाच बाबीचे देयक अदा करण्यात येत आहे. सदर रस्त्यावर मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदीनुसारच त्या त्या कि.मी. मध्ये काम करण्यात आलेले आहे.

(४) याबाबत तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता यांच्या मार्फत चौकशी सुरु असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंतप्रधान व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कोकणातील कामे निकृष्ट झाल्याबाबत

**(४२) ४४८७ (१७-०७-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक १७६८ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील सर्व जिल्ह्यामध्ये पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामांमध्ये अधिकारी व ठेकेदार संगनमत करून रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची करीत असल्याने दरवर्षी शासनाच्या कोट्यवधी निधीचा गैरव्यवहार होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे होऊन रस्त्यांची दुरवस्था झाली असून स्थानिकांनी तक्रार करूनही संबंधित अधिकारी कोणत्याच प्रकारची कारवाई करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली सर्कलमध्ये येणाऱ्या खेड तालुक्यातील बेरळ-बोरज-कोंडिवली या ११ कि.मी. रस्त्यांचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत करण्यात आले असून यात ७२ मोऱ्यांची कामे न करता तसेच या कामाची तपासणी न करता सात कोटीचे देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्त्यांची निकृष्ट कामे करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) हे खरे नाही.

सदर तक्रारींबाबत चौकशी करण्यात आली असून तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आले.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर कामाची SQM व SSQM यांनी गुणवत्ता तपासणी केली असून त्यांनी कामास कोणताही प्रतिकूल शेरा दिलेला नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील बालविवाहाच्या प्रथेबाबत**

**(४३) ४५०१ (१७-०७-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४७०९७ ला दिनांक १७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) “संपर्क” या सामाजिक संस्थेने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार देशात सर्वाधिक होणाऱ्या बालविवाहामध्ये देशातील ७० जिल्ह्यांमधील पुरोगामी महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विषयावर महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन घेऊन चर्चा करण्यात यावी अशी सूचना या संस्थेने शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

“संपर्क“ या सामाजिक संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही. तथापि, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण सन २०१५-२०१६ च्या अहवालामध्ये बाल विवाह होणाऱ्या देशातील ७० जिल्हयांपैकी महाराष्ट्रातील १७ जिल्हयांचा समावेश आहे.

(२) अशा प्रकारची सूचना या विभागास प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेतील गैरव्यवहाराबाबत

**(४४) ४५०४ (१७-०७-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणकेश्वर, वाल्हा, वालवड, हिवार्डा (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांमध्ये सन २०१६-२०१७ मध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाला खोलीकरणाचे काम लोकसहभागातून पूर्ण करण्यात आले होते परंतु संबंधित तालुका कृषी अधिकारी व तत्कालीन कृषी सहाय्यक यांनी संगनमताने सदर कामाचे देयक ठेकेदारामार्फत घेतल्याची तक्रार केली असून बोगस सहया करून ठेकेदारास बिल अदा केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (२०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक, वसुंधरा पाणलोट शाखा, उस्मानाबाद यांचेमार्फत सदर कामांची स्वतंत्र तपासणी पथक नेमून चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अहवालानूसार नाला खोलीकरणाची ०७ कामे कृषी विभागामार्फत करण्यात आली होती. मापन पुस्तिकेमध्ये नोंदविलेल्या परिमाणाप्रमाणे संबंधित कंत्राटदारास देयके अदा करण्यात आली आहेत. तथापि, कामांची प्रत्यक्ष तपासणी केली असता मापन पुस्तिकेतील नोंदी व कामांच्या प्रत्यक्ष नोंदी यामध्ये तफावत आढळून आली आहे. कमी परिमाण आढळून आलेल्या नाला खोलीकरण कामांकरीता रुपये ४.३७ लक्ष इतकी रक्कम वसुलपात्र आहे. सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासन नियमानुसार प्रशासकीय कारवाईची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना थकीत मानधन मिळणेबाबत

**(४५) ४५३९ (१७-०७-२०२०). श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ९ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सुमारे ५,५८६ अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे दोन महिन्यांचे मानधन आणि मागील दहा महिन्यांचे वाढीव मानधन थकीत असल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याची बाब वसई तालुक्यातील अशोक गजानन शेळके या एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास एका निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पालघर जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना त्याचे थकीत मानधन आणि वाढीव थकीत मानधन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे माहे जून, २०२० पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले असून माहे जुलै, २०२० ची मानधन देयके कोषागारात सादर करण्यात आली आहेत. तसेच माहे ऑक्टोबर,२०१८ ते माहे जुलै,२०१९ पर्यंतचा वाढीव मानधनाचा फरक देखील अदा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आगाशी, कामण, पारोळ आणि भाताणे (ता.वसई, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४६) ४५४५ (१७-०७-२०२०). श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक २१५३ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगाशी, कामण, पारोळ आणि भाताणे (ता.वसई, जि.पालघर) जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या ५० वर्षापूर्वी बांधलेल्या चार प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती जीर्ण होऊन मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चारही प्राथमिक आरोग्य केंद्रात बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भुलतज्ञ आणि इतर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी त्याचप्रमाणे (सोनोग्राफी मशीन, एक्सरे मशीन, डायलेसीस केंद्र) इत्यादी सोई-सुविधांचा अभाव आणि औषधांचा तुटवडा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आगाशी, कामण, पारोळ आणि भाताणे या चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

शासनाच्या निकषाप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भुलतज्ञ ही पदे मंजूर नाहीत. तसेच सोनोग्राफी मशीन, एक्सरे मशीन, डायलेसीस केंद्र ह्या सुविधा उपलब्ध नसतात. बिगर आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी गट-अ २ पदे मंजूर आहेत व आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी गट-अ चे १ पद व वैद्यकिय अधिकारी गट-ब चे १ पद अशी २ पदे मंजूर आहे.
(३) सद्य:स्थितीत निवेदन आढळून येत नसून निवेदनाचा शोध सुरू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून सदर चारही प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत शासनाच्या निकषाप्रमाणे अपेक्षित आरोग्य विषयक सुविधा जनतेस पुरविण्यात येतात.

## राज्याच्या विकासाबाबत प्रादेशिक असमतोलाच्या अभ्यासासाठी तज्ञांची समिती गठित करण्याबाबत

**(४७) ४५७२ (२२-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या समतोल विकासाबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ.विजय केळकर समितीच्या शिफारशींवर शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे राज्याच्या विकासाबाबतच्या प्रादेशिक असमतोलाचा शोध घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी पुन्हा तज्ञांची समिती नेमण्याचे आदेश मा.राज्यपालांनी दिनांक ६ मार्च, २०२० रोजी शासनाला दिले असून राज्याच्या मागास भागातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी जलसंपदा विभागाने योजना तयार कराव्यात असेही आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेशांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२७-०८-२०२०) :** (१) होय, मा.राज्यपाल महोदय यांनी वार्षिक कार्यक्रम सन २०२०-२०२१ करीता दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी प्रादेशिक असमतोलाचा शोध घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी समिती नेमण्याचे निदेश दिले आहेत.

(२) व (३) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचे पुनर्गठण झाल्यानंतर मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार प्रादेशिक असमतोलाचा शोध घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी समिती नेमण्याबाबत विचार करण्यात येईल.

---

## पिंजर निहिदा (ता.टाकळी, जि.अकोला) येथील पुलाचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(४८) ४५८१ (१७-०७-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंजर निहिदा (ता.टाकळी, जि.अकोला) येथील अंदाजे सहा कोटी रकमेच्या पुलाचे बांधकाम गत एक वर्षापासून प्रलंबित असल्याने जवळपास सात गावांतील नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे जून, २०२० च्या शेवट्च्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी ठेकेदार व इंजिनियर यांचेवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना सुचित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-०८-२०२०) :** (१) सदर बाब निदर्शनास आली नाही.

(२) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना सुचित केले असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेर धामना (ता.तेल्हारा, जि.अकोला) प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४९) ४६४१ (२२-०७-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा तालुक्यातील (जि.अकोला) नेर धामना या सिंचन प्रकल्पास माहे ऑक्टोबर, २००८ मध्ये १८१ कोटी १९ लाख रूपयांच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्प उभारण्यात येणारा परिसर खारपाणपट्टा होता, अशा भागात सिंचन करता येत नसून हा संपूर्ण सपाट भाग असून त्याठिकाणी पाणी अडवण्याची नैसर्गिक संरचना नाही अशा परिसरात गेल्या दोन ते तीन वर्षात जमिनीच्या पोटातील क्षार वर येऊन जमीन खराब होते असे असतानाही हा सिंचन प्रकल्प लादण्याचा निर्णय विदर्भ सिंचन विकास महामंडळाने घेतला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी प्रकल्प उभारणीसाठी विशिष्ट स्वरूपाच्या आराखड्याची आवश्यकता होती मात्र विदर्भ सिंचन विकास महामंडळाने आपल्या मर्जीतील विशिष्ट कंत्राटदारांना काम मिळावे म्हणून अतिशय घाई केली, खारपाणपट्टयात सिंचन प्रकल्प उभारणीसाठी विशिष्ट प्रकारचा अनुभव आवश्यक असतो या कंत्राटाकरीता 'एम-एस पाइप्स' आणि 'रायझिंग मेन' हा अनुभव अपेक्षित होता तसेच अनुभव प्रमाणपत्र ५ वर्षामधील असणे आवश्यक असताना निविदा भरताना मेसर्स एमएमएस इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि मे.डी.ठक्कर कन्स्ट्रक्शन प्रा.लिमिटेड या संयुक्त भागीदारीतील कंपनीने अयोग्य व जुने अनुभव प्रमाणपत्र जोडून बनवाबनवीच्या आधारावर हे कंत्राट मिळविले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विदर्भ सिंचन विकास महामंडळाच्या गैरकारभारामुळे नेर धामना प्रकल्पात कोटयवधीचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदार व कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०७-०८-२०२०) :** (१) होय, पुर्णा बॅरेज-२ (नेर धामना) ता.तेल्हारा जि.अकोला या प्रकल्पास दिनांक २४/१०/ २००८ रोजी रुपये १८१.९९ कोटीस प्र.मा.मिळाली असून निविदा प्रक्रियेअंती दिनांक २/३/२००९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.
(२) नाही, नेरधामणा प्रकल्पाच्या परिसरामध्ये सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. जमिनीच्या पृष्ठाभागावरील जल सिंचनामुळे जमीन क्षारयुक्त होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) नेर धामना प्रकल्पाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फ़तचे चौकशीअंती असे निष्पन्न झाले आहे की, कंत्राटदार यांनी बनावट वर्क डन प्रमाणपत्र तयार करुन ते पुर्व अर्हता प्रपत्रासोबत सादर केले. त्या बनावट प्रमाणपत्राचे आधारे कंत्राटदार यांना नमुद प्रकल्पातील कंत्राट मिळालेले आहे.

(४) याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु आहे.

(५) नेर धामना (पुर्णा बॅरेज) ची चौकशी लाचलुचपत विभाग पोलीस ठाणे, सिव्हील लाईन, अकोला मार्फत सुरू असून FIR क्र. ००४७/२०२०, दिनांक १२/०२/२०२० अन्वये तीन अधिकाऱ्यांवर व संबंधित कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

---

## प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेबाबत

**(५०) ४६५६ (१७-०७-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.पंतप्रधान यांनी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचा तिसरा टप्पा जाहीर केला असून त्यामध्ये सुमारे १.२५ लाख कि.मी.चे रस्ते उभारणे, ग्रामीण बाजार समित्या, शाळा आणि रूग्णालये यांना चांगली कनेक्टिव्हिटी असावी हा मुख्य उद्देश असून तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रासाठी सहा हजार ५५० कि.मी.चे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आणि माहे जानेवारी, २०२० अखेरपर्यंत याद्दष्टीने प्रस्ताव सादर करण्यास राज्य शासनाला सांगण्यात आले परंतु शासनाने आपले प्रस्ताव सादर केलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव पाठविण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, महाराष्ट्राने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविले नाहीत तर दुसरीकडे अन्य राज्यांमध्ये सुमारे १७ हजार कि.मी.चे रस्ते मंजूर झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने विचार करून मा.मुख्यमंत्री यांनी आढावा घेऊन हे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी माजी मुख्यमंत्री आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेता यांनी दिनांक ७ जुलै, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०७-२०२०) :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) सदरहू प्रस्ताव पाठविण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१. माहे मार्च, २०२० अखेर सुरु झालेल्या COVID-१९ च्या राज्यव्यापी लॉकडाऊनमुळे रस्त्यांची क्षेत्रिय पहाणी करुन आवश्यक माहिती जमा करणे, तसेच मा.लोकप्रतिनिधींची Core Network ला मान्यता घेणे या बाबी प्रलंबित राहून विलंब झाला आहे.
२. MRRDA यंत्रणेकडील उपलब्ध अपुऱ्या मनुष्यबळामार्फतच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची विकास कामे सुरु असल्याने, प्रमंग्रासयो भाग-३ च्या प्रस्ताव तयार करण्याच्या प्रक्रियेत पुरेश्या मनुष्यबळा अभावी विलंब झाला आहे.
३. प्रमंग्रासयो भाग-३ साठी GIS Database तयार करणे आवश्यक असल्यामुळे, सदर GIS Database हा MRSAC या बाह्ययंत्रणेमार्फत तयार करण्यात जास्त वेळ खर्ची पडून विलंब झाला आहे.

(४) होय, हे खरे आहे. तथापि, सदर मागणी दिनांक ०७ जुलै, २०२० च्या पत्रान्वये करण्यात आली आहे.

(५) याबाबत मंत्री, ग्रामविकास विभाग व सचिव, मुमंग्रासयो यांनी दिनांक १४/७/२०२० रोजी आढावा बैठक घेऊन प्रमंग्रासयो भाग-३, प्रथम बॅच अंतर्गत २,००० कि.मी. लांबीचे प्रस्ताव माहे जुलै, २०२० अखेर व द्वितीय बॅच अंतर्गत ४,५५० कि.मी. लांबीचे प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०२० अखेर केंद्र

शासनास सादर करण्याबाबत उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने विभागनिहाय व जिल्हानिहाय नियोजन करण्यात येवून प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही वेगाने प्रगतीपथावर आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आले आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.